# कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे शैक्षणिक कार्यामधील योगदान

प्रा. ए. एच. शिंदे
एस. पी. एच. महिला महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प.

महात्मा गांधीच्या प्रेरणेतून सक्रिय राजकारणात भाग घेण्यास भाऊसाहेबांनी सुरुवात केली. गांधीजींना या सर्व कार्यकर्ते, गरीब लोकांच्या मुलांकरिता (आदिवासी), हरिजन यांच्या मुलांकरिता शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याच्या प्रेरणेतून भारावून भाऊसाहेब हिरे यांनी व्हॉलेंटरी शाळा सुरु केल्या. प्रामुख्याने नाशिक व ठाणे जिल्ह्यात शाळा सुरू केल्या. नंतर निमगांव शिक्षण मंडळाची स्थापना केली. कालांतराने आदिवासी सेवा समिती व महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेची स्थापना केली. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयाच्या इमारतीचा कोणशिला समारंभ केला.

मालेगाव कॅम्प मध्ये भाऊसाहेबरंनी जमीन संपादन करून या जागेचा मुंबईचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट दादरकर व पत्की यांच्याकडून मास्टर प्लॅन तयार करून वेगवेगळ्या ठिकाणी हल्ली उभ्या असलेल्या सर्व संस्था (इमारती) तेथे उभ्या केल्या. मालेगावी मुक्कामी असतांना भाऊसाहेब कमीतकमी दोन तास संस्थेच्या कार्यालयात बसत होते. कामकाजाचा आढावा घेऊन पुढील कामाची दिशा ठरवित होते. आदिवासी भागात जागा संपादित करून तेथे पोस्ट बेसिक आश्रमशाळा उभ्या केलेल्या आहेत. आदिवासी मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली करून दिलेली आहेत. आदिवासींना आज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे. ही परंपरा त्यांच्या पश्चात कै. व्यंकटराव हिरे, श्रीमती पुष्पाताई हिरे, मा. प्रशांत दादा हिरे, मा. अपुर्व भाऊ हिरे व मा. अद्वय हिरे योग्य प्रकारे सांभाळत आहेत. त्यांनी लावलेल्या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

भाऊसाहेब हिरे हे महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती स्थापन करण्याच्या अगोदर नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक या संस्थेतही त्यांचे योगदान आहे. या संस्थेचे ते काही काळ अध्यक्षही होते. मराठा विद्याप्रसारक या संस्थेचे आद्य संस्थापक म्हणून रावसाहेब थोरात, काकासाहेब वाघ यांच्या बरोबर भाऊसाहेबांचाही नामोल्लेख प्रत्येकवेळी होत असतो. या शिक्षण संस्थेत कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या नावाने काही माध्यमिक विद्यालये व महाविद्यालयेही आहेत.

अखिल भारतीय मराठा शिक्षण संस्थेचे ते अध्यक्ष होते. त्या संस्थेचे मुख्य कार्यालय पुणे येथे होते. भाऊसाहेब महसूल मंत्री असतांना कोल्हापुर जिल्ह्यातील गारगोटी ही संस्था, ताराराणी विद्यापीठचे संस्थापक माजी खासदार व्ही. टी. पाटील यांच्याकडे चालविण्यास दिली होती. तसेच कोसवाड, जि. ठाणे येथील संस्था माजी आमदार श्री. पाटील (आग्री समाजाचे) यांना चालविण्यास दिली होती. ही संस्था पूर्वी सरकारच्या ताब्यात होती. भाऊसाहेब हिरे यांच्या मते शिक्षण संस्था सरकार व्यवस्थित चालवू शकत नाही म्हणून वरील दोन्ही शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीच्या ताब्यात दिल्या. शैक्षणिक क्षेत्रात भाऊसाहेब हिरे हे कर्मवीर भाऊराव पाटील व शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक पंजाबराव देशमुख यांच्याशी सल्लामसलत करीत व त्यांचे विचार ऐकून घेत व प्रसंगी त्यांनाही मार्गदर्शन करीत. बऱ्याच दोघेही पुणे, मुंबई किंवा अमरावती येथे एकत्र बसून चर्चा करीत व एकमेकांना सहकार्य करीत होते.

जेड्यापाड्यातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून शिक्षण संस्था उभारणीचा जो इतिहास आहे तो असा की महात्मा गांधी विद्यामंदिरची स्थापना होण्यापूर्वी विसापूर, निमगाव, सौंदाणे, मालेगाव-कॅम्प इत्यादी ठिकाणी शिक्षण मंडळे होती. परंतु या मंडळाद्वारे उल्लेखनीय समाजकार्य करता येत नसल्यामुळे या सर्व मंडळांचे एकत्रीकरण करून एक अद्ययावत शिक्षणसंस्था स्थापन करावी असा आग्रह वरील मंडळांच्या प्रमुखांनी कर्मवीर भाऊसाहेबांना केला. भाऊसाहेबांनी सर्व मंडळांचे विलिनिकरण करून १९५२ मध्ये महात्मा गांधी विद्यामंदि या संस्थेची स्थापना केली. नंतर कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालयाच्या रूपाने भव्य वास्तू उभी राहिली. के. बी. एच. विद्यालय व म. स. गा. महाविद्यालय ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी पूर्वी दगडाच्या खाणी होत्या. त्या खाणी बुजवून त्या ठिकाणी भव्य इमारती उभारल्या. काही ठिकाणी जमिनी घेऊन १२० एकर जमिनीचे क्षेत्र भाऊसाहेबांनी मिळवले आणि आज त्याच ठिकाणी संस्थेच्या भव्य इमारतीतून ज्ञानाची गंगा सातत्याने वहाते आहे.

इ.स. १९५४ मध्ये एस.एस.सी. ची पहिली तुकडी बाहेर पडली. त्यात काकासाहेब पहिले आले. त्यानंतर अभियंता श्री. तोरवणे असे बुद्धीमान व गुणवान विद्यार्थी याच शाळांमधून मिळाले. १९५४ मध्ये मालेगाव येथे पहिले महाविद्यालय सुरू करावे या उद्देशाने मा. पु. ल. देशपांडे व सुनिता ताई देशपांडे यांना मालेगावी आणले. त्यांनी वर्षभर संस्थेचा कार्यभार सांभाळला. तेव्हा राजकाराणाच्या

धकाधकीमुळे ते महाविद्यालय सुरू होऊ शकले नाही. ते १९५९ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय या नावाने सुरू करण्यात आले.

भाऊसाहेबांनी कायद्याची पदवी घेतल्यानंतर वकिली करण्यापेक्षा लोकसेवेचे काम करण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्य आंदोलनापासून ते अखेर पर्यंत भाऊसाहेबांनी आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटवलेला आहे. १९५० मध्ये भाऊसाहेबांच्या स्वागताध्यक्षतेखाली नाशिक येथे राष्ट्रीय काँग्रेस चे अधिवेशन भरले. या अधिवेशनात भाऊसाहेबांनी त्यांच्या कर्तृत्त्वाची छाप पाडली. सर्व अधिवेशनाचे संघटन त्यांनी केले. त्यावेळी त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत देखणे होते. दोन्ही सोग्याचे धोतर, कोट, पांढरी शुभ्र टोपी. दृष्ट लागेल असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आम्हाला पहावयास मिळाले. अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस त्यांच्याकडे लक्ष वजनदार व्यक्तिमत्त्व म्हणून पाहू लागले.

मुंबई राज्याच्या मंत्रीमंडळात भाऊसाहेब महसूल मंत्री झालेत. या काळातच महाराष्ट्रत जे सामाजिक परिवर्तन घडविणारा कुळ कायदा त्यांनी पास करून घेतला. जमिनीचे फेरवाटप केले. सहकार क्षेत्रांतील कर्मवीरांचे कार्य अविस्मरणीय आहे. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुंबई भू-विकास बँक यांच्या सहकार क्षेत्रांतील भाऊसाहेबांचे कार्य अत्यंत उल्लेखनिय आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रांत कर्मवीर भाऊसाहेबांचे कार्य आदर्शवत व पायाभूत आहे. असा नेता म्हणजे आपल्याला वरदानच होते.

**संयुक्त महाराष्ट्राचे प्रणेते**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रांत भाऊसाहेबांचा कर्तृत्त्वाचा ठसा उमटलेला होता. स्वातंत्र्यानंतर भाऊसाहेबांना भारतीय राजकारणात मंत्रीपद मिळण्याची संधी असूनही भाऊसाहेबांनी ती नाकारली. ३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधींचा खून झाला त्यामुळे देशाच्या राजकारणात महाराष्ट्राचे महत्त्व वाढू न देण्याचे सरदार वल्लभभाई पटेल व पंडित नेहरू यांनी ठरविले. त्याचा प्रत्यय दार कमिशन मध्ये आला.

कर्मवीरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी फार मेहनत घेतली. त्यांच्या सिंहगर्जनेचे प्र. के. अत्रे यांनी कौतूक केले ते पुढील प्रमाजे, "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा एकसारखा पिच्छा पुरवून त्यावर महाराष्ट्रीय काँग्रेस जवानांमध्ये एकमत घडवून आणायचे हे फार धैर्याचे काम होते. ते धैर्य श्री. भाऊसाहेब हिरे यांनी दाखविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे." मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा या आग्रहासाठी भाऊसाहेबांनी आपल्या मंत्रीपदाचा राजिनामा दिला होता. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्यामुळेच आज मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आहे.